# घेण्यापेक्षा देण्याचा आनंद अवर्णनीय- नसीमा हुरजुक

## हळबे महाविद्यालयात माय- लेकींचा स्नेहमेळावा

▶ दोडामार्ग (प्रतिनिधी)

समाजात अपंगाबरोबरच अनेक दुर्बल घटक अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. या घटकांसाठी सर्वांनी मदतीचा हात पुढे केला पाहीजे. आपल्या बरोबरच्या दुर्बल घटकांना पुढे घेऊन गेले तरच आपला उत्कर्ष होईल. दुर्बलासाठी काम करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्थाना मदत करताना, ती घेण्यापेक्षा देण्याचा आनंद हा अवर्णनिय असतो. असे विचार आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजसेविका व हेल्पर्स ऑफ दि हॅडीकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती नसीमा हुरजूक यांनी मांडले.

त्या येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्यावतीने 'लेक लाडकी' अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थीनी व त्यांच्या आई अर्थात मायलेकींचा स्नेहमेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मुलींनी केले होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने व सावित्रीबाई फुले व लक्ष्मीबाई हळबे यांच्या प्रतिमा पजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यापुढे म्हणाल्या की, अपंगत्वाचा ठसा मिटविण्यासारखे त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे. त्यासाठी त्यांच्या स्वतंत्र शाळा हव्यात. कारण सर्वसाधारण मुलांच्या शाळेत त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. मी स्वतः ते अनुभवले आहे. कधी कधी जेव्हा माणसाला खरी गरज असते तेव्हा कोणीही मदत करत नाही. पण जेव्हा गरज नसते तेव्हा हजारो हात पुढे येतात. तेव्हा योग्य वेळी त्यांना मदत केली पाहीजे. आपल्या संस्थेतील अनेक उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितलेल्या अनेक आठवणींना विदयार्थ्यांना अश्रू आवरता आले नाही. त्यांनी वृध्दाश्रम काढण्याचे स्वप्न बोलून दाखविले.

यावेळी त्यांच्या जीवन प्रवासावर व कार्यावर आधारित लघुपट दाखविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. व्हि. ए. पाटील यांनी महाविद्यालयाने राबविलेल्या नवनविन उपक्रमांची माहिती देऊन महिला विकास कक्षाच्या स्थापनेमागील उद्दिष्टे कथन केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभाग प्रमुख आर. एस. इंगळे, सौ. किरण नाईक तसेच सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. किरण नाईक तर आभार कु. पोर्णिमा वराडकर हिने मानले.




महिला उद्योजिका सौ. सुजल गवस यांचा सत्कार करताना समाजसेविका नसिमा हुरजुक.

### नसिमांच्या संस्थेला मदतीचा हात

नसिमा हुरजूक यांच्या हेल्पर्स ऑफ दि हॅडीकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेला विदयार्थिनींनी जमा केलेल्या भाऊबीज निधीतून ५०००/- रू. चा धनादेश विद्यार्थिनींच्या हस्ते दिला. सौ. सुजल सुर्यकांत गवस यांनी ही २०००/- रू. ची आर्थिक मदत दिली. प्राचार्यांच्या हस्ते नसिमा हुरजूक यांचा श्रीफळ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे स्थानिक सदस्य विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर उपस्थित होते.

### माता व महिला उद्योजिकांचा सत्कार

यावेळी एकाच कन्या प्राप्तीनंतर कुटुंबनियोजन करणाऱ्या तालुक्यातील सौ. माधुरी सावंत, सौ. वसंधरा गवस, सौ. वैशाली गवस यांचा, स्वावलंबी अपंग कु.संगीता गाऊळ हिचा, कर्तबगार स्त्रीया सौ. माधवी मणेरकर, सौ. सुजल सूर्यकांत गवस तसेच युवती स्वयं निर्भर निधी अर्थात भाऊबीज निधी जास्त संकलन करणाऱ्या विद्यार्थीनी कु. प्रज्ञा शिरोडकर व कु. ज्योती जाधव व महाविद्यालयाच्या वरिष्ठ लिपिक सौ. किरण नाईक या सर्वांचा पुष्पगुच्छ देऊन नसिमा हुरजुक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.